## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-२७१२/२०२२

**अपिलार्थी, श्री.पद्माकर काशिनाथ वेखंडे**
**मु.जांभे, पो.लेनाड खुर्द, ता.शहापूर,**
**जि.ठाणे ४२१ ६०१.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय शिरगांव,
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय शहापूर,
ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक** : ७.४.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.४.२०२२ | २८.६.२०२२ | ६.६.२०२२ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.१९.९.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "खोटी माहिती देऊन मुळ खरी माहिती दडपण्याचा प्रयत्न केला आहे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ७.४.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. चैताली राठोड, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शिरगांव आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. नरेश हरी पाटील, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती शहापूर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(श्री.सागर मनोहर वराडे यांनी मौजे जांभे येथे गट नं.७६ मध्ये बांधलेल्या इमारतीचे पायाची व इमारत बांधकाम परवानगी व मासिक सभेच्या बांधकामाच्या परवानगी ठरावाच्या सर्टीफाय नकला मिळण्याबाबत.) "*

*"(श्री.सागर मनोहर वराडे यांनी मौजे जांभे येथे गट नं.७६ मध्ये ग्रामपंचायतची कोणतीही बांधकाम परवानगी न घेता बांधकाम केले आहे. तरी इमारतीच्या पायाची बांधकाम परवाना व इमारतीची बांधकाम परवानगी घेतली असेल त्या परवानगीच्या सर्टिफाय नकला व बांधकाम परवानगीच्या मासिक सभेच्या ठरावाच्या नकला याची माहिती मिळणेबाबत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.६.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, "अपिलकर्ते यांचे दि.६.६.२०२२ रोजीचे दोन अर्ज व दि.२०.५.२०२२ रोजीचा एक अर्ज असे एकूण तिनही अर्जात नमूद केलेली माहिती अपिलकर्ते यांना दि.२९.६.२०२२ पर्यंत विनामूल्य देण्यात यावी व त्याचा अहवाल या कार्यालयात सादर करावा." असे आदेश पारित केले आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना प्रथम अपिलिय अधिकारी यांच्या आदेशानंतर दि.२९.६.२०२२ रोजी माहिती प्राप्त झाली आहे. तथापि, प्राप्त झालेली माहिती चुकीची आहे असे त्यांनी म्हणणे मांडले.

पुरविलेल्या माहितीनुसार श्री.सागर मनोहर वराडे यांनी गट नं.७६ क्षेत्र ६० गुंठे या जमिनीवर शेतीची अवजारे व शेतमाल ठेवण्यासाठी बांधकामाची घरपट्टी मिळण्यासाठी दि.२१.१०.२०२१ रोजी ग्रुप ग्रामपंचायत शिरगाव यांचेकडे अर्ज केला. या अर्जामध्ये सातबारा सोबत जोडला आहे असे नमूद केले आहे. हा अर्ज दि.२२.१०.२०२१ रोजी ग्रुप ग्रामपंचायत शिरगाव येथे प्राप्त झाल्याबाबत ग्रामसेवक यांची स्वाक्षरी आहे. मात्र, या अर्जासोबत गाव नमुना सातबाराची जी प्रत लावण्यात आली आहे ती प्रत ऑनलाईन सातबाराची असून ती दि.२१.६.२०२२ रोजी डाऊनलोड केली असल्याची नोंद या प्रतीवर आहे. ज्या अर्थी ७/१२

दि.२१.६.२०२२ रोजी डाऊनलोड करण्यात आला आहे त्याअर्थी हा सातबारा जोडून अर्ज दि.२१.१०.२०२१ रोजी ग्रामपंचायतीला सादर करणे शक्य नाही. तथापि, आपल्याला पुरविलेल्या माहितीमध्ये सदरचा अर्ज दि.२२.१०.२०२१ रोजी ग्रुप ग्रामपंचायत शिरगांव येथे प्राप्त झाला असल्याची माहिती आहे. म्हणजेच आपणास चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे असा युक्तिवाद अपिलार्थी यांचेतर्फे करण्यात आला.

उपलब्ध कागदपत्रे पाहता अपिलार्थी यांचे म्हणणे हे वस्तुस्थितीवर आधारित असल्याचे दिसून येते व त्यावरून अपिलार्थींना खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली आहे असे स्पष्ट होते. सबब, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. चैताली विनोद राठोड, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शिरगांव यांनी अपिलार्थी यांना चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. चैताली विनोद राठोड यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. चैताली विनोद राठोड, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय शिरगांव यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक २४.४.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन चुकीची, खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.३०.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. चैताली विनोद राठोड, ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय शिरगांव, ता.शहापूर, जि.ठाणे ४२१ ६०१.